रास्त कर्ज वितरण – कर्ज खाते दंड शुल्क आकारणी धोरण

प्रस्तावना : नागरी सहकारी बँका खालील कारणासाठी कर्जदारांना दंड व्याज दर आकारणी करतात

१. हप्ता मुदतीत न भरलेस.

२. वेळेत व्याज न भरलेस.

३. वेळेत माल साठा (Stock Statement) पत्रक न दिलेस.

४. कर्ज बोजा नोंद मालमत्ता पत्रके / आर सी बुक न दिलेस.

५. अंतर्गत अगर शासकीय ऑडिट रिपोर्ट मधील कर्जाबाबत दोषांची पुर्तता न केलेस.

६. कर्जमंजुरी पत्रकातील अटींची पूर्तता न केलेस.

७. कर्जाचा विनियोग कर्ज कारण सोडून इतर कारणासाठी केलेस.

८. कर्ज खातेस वार्षिक/सहामाही/तिमाही फायनान्शियल स्टेटमेंट सबमिट न केलेस.

जादा व्याजदर किंवा दंडव्याजदर कर्जदारास शिस्त लावणेसाठी आहे. तर ते बँकांनी उत्पन्नाचे साधन समजु नये.जादा/दंड व्याजदर आकारणी मुळे ग्राहकांचे तक्रारीचे प्रमाण वाढले आहे.त्यामुळे भारतीय रीझर्व्ह बँकेने दि.१८/०८/२०२३ चे परिपत्रकानुसार खालील प्रमाणे सुचना दिल्या आहेत.

१. जर एखाद्या अटींची पुर्तता न केलेस दंड शुल्क आकारणी करावी मात्र दंड व्याज आकारू नये तसेच दंड शुल्क आकारणी वर सरळ अगर चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारणी करू नये.

२. जर एखाद्या अटींची पुर्तता न केलेस बँकेने इतर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारणी करू नये.

३. बँकेने दंड शुल्क आकारणीचे धोरण ठरवावे.

४. दंड शुल्क आकारणी रास्त असावी.

५. दंड शुल्क आकारणी व्यक्तिगत कर्जास बिगर व्यक्तिगत कर्जापेक्षा जास्त नसावी.

६. दंड शुल्क आकारणी ची कारणे व शुल्क कर्जरोखा मध्ये नमूद असावे व बँकेच्या वेबसाइट वर प्रसिद्ध करावे.

७. कर्ज अटींची पुर्तता करणेसाठी पाठपुरावा केलेनंतर दंड शुल्क आकारणी ची माहिती कर्जदारास देणेत यावी व प्रत्येक वेळी दंड शुल्क आकारणीची माहिती कर्जदारास देणे आवश्यक आहे.

पान नं.१.....

रास्त कर्ज वितरण – कर्ज खाते दंड शुल्क आकारणी धोरण

दंड शुल्क आकारणीचे धोरण खालील प्रमाणे

१. जर कर्जदाराने कर्जरोख्यात नमूद केले प्रमाणे कर्ज हप्ता देय तारखे नंतर हप्ता न भरलेस कर्ज हप्ता रक्कमेवरती २.५% प्रमाणे दंड शुल्क आकारणी केली जाईल.

२. जर कर्जदाराने कर्जरोख्यात नमूद केले प्रमाणे कर्ज देय तारखेस (DUE-DATE) न भरलेस एकुण देय रक्कमेवरती (Outstanding Balance) २.५% दंड शुल्क आकारणी केली जाईल.

३. वेळेत माल साठा (Stock Statement) पत्रक प्रती महिन्याचे १० तारखेनंतर दिलेस विलंबित कालावधी करीता एकुण देय (Outstanding Balance) रक्कमेवरती २.५% दंड शुल्क आकारणी केली जाईल.

४. कर्जखाते खर्च पडलेनंतर बोजा नोंद मालमत्ता पत्रके,आर सी बुक,आर्थिक विवरण पत्रके व इतर पत्रके २ महिन्यानंतर न दिलेस प्रती महिना रु.२००/- दंड शुल्क आकारणी केली जाईल.

(कर्जदारास बोजा नोंद मालमत्ता पत्रके,आर सी बुक,आर्थिक विवरण पत्रके व इतर पत्रके बँकेत जमा करणेस २ महिन्याचा कालावधी देणेत यावा).

५. ऑडीट रिपोर्ट मधील इतर पुर्तता २ महिन्यापर्यंत न केलेस प्रती महिना रु.२००/- दंड शुल्क आकारणी केली जाईल. (कर्जदारास ऑडिट रिपोर्ट मधील दोष पुर्तता करिता २ महिन्याचा कालावधी देणेत यावा).

६. कर्ज मंजुरी पत्रकातील अटींची पुर्तता २ महिन्या पर्यंत न केलेस प्रती महिना रु.२००/- दंड शुल्क आकारणी केली जाईल.(कर्जदारास कर्ज मंजुरी पत्रकातील अटींची पुर्तता करणेस २ महिन्याचा कालावधी देणेत यावा).

७. सदर दंड शुल्क बरोबर आवश्यक तो जी.एस.टी. कर्जदारास भरावा लागेल.

८. सदर दंड शुल्क हे कर्जाच्या मुद्दल मध्ये न मिळवता ते स्वतंत्र दाखवणे व त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारणी करू नये.

९. सदर दंड शुल्क आकारणी बाबत कर्जमंजुरीपत्रकामध्ये व कर्जरोख्यात नमूद करणेत येईल. सदर दंड शुल्क बाबत कर्जदारास पूर्व कल्पना देणेची आहे.

१०. सदर दंड शुल्क आकारणी बाबत बँकेच्या नोटीस बोर्ड व वेबसाईट वर प्रसिद्ध करणेत यावी.

११. सदर दंड शुल्क आकारणी दि.०१/०४/२०२४ पासुन लागु केली जाईल.

संचालक मंडळ सभा दिनांक २८/०३/२०२४ ठराव नं ३८ ने वरील प्रमाणे धोरणास मंजुरी देणेत येत आहे

सहाय्यक व्यवस्थापक जनरल मॅनेजर मुख्य कार्यकारी अधिकारी

|| संमती पत्र ||

कर्ज खाते क्र. :-..... कर्ज मंजूर रक्कम रु. :-.....

मी/आम्ही सही करणार लिहुन संमती पत्र कि,

१).....

२).....

३).....

४).....

५).....

६).....

७).....

बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे आदेशानुसार बँकेचे मा. संचालक मंडळ सभा क्र. १४ दि.२८/०३/२०२४ ठराव क्र. ३८ चे मंजुरीने बँकेने तयार केलेल्या रास्त कर्ज वितरण – कर्ज खाते दंडशुल्क आकारणी धोरणानुसार चार्जेस आकारणेस आम्ही,कर्जदार मान्यतादार व जामीनदार यांची संमती असेल.बँकेने केलेले दंड शुल्क आकारणी बाबतचे नियम आम्ही वाचून पाहिले ते खालील प्रमाणे.

रास्त कर्ज वितरण – कर्ज खाते दंड शुल्क आकारणी नियम

दंड शुल्क आकारणी नियम खालील प्रमाणे

१) जर कर्जदाराने कर्जरोख्यात नमूद केले प्रमाणे कर्ज हप्ता देय तारखे नंतर हप्ता न भरलेस कर्ज हप्ता रक्कमेवरती २.५% प्रमाणे दंड शुल्क आकारणी केली जाईल.

२) जर कर्जदाराने कर्जरोख्यात नमूद केले कर्ज प्रमाणे देय तारखेस (DUE –DATE) न भरलेस एकुण देय रक्कमेवरती (Outstanding Blance) २.५% दंड शुल्क आकरणी केली जाईल.

३) वेळेत माल साठा (Stock Statement) पत्रक प्रती महिन्याचे १० तारखे नंतर दिलेस विलंबित कालावधी करीता एकुण देय (Outstanding Blance) रक्कमेवरती २.५% दंड शुल्क आकारणी केली जाईल.

४) कर्जखाते खर्च पडले नंतर बोजा नोंद मालमत्ता पत्रके,आर सी बुक,आर्थिक विवरण पत्रके व इतर पत्रके २ महिन्या नंतर न दिलेस प्रती महिना २००/-दंड शुल्क आकारणी केली जाईल.

(कर्जदारास बोजा नोंद मालमत्ता पत्रके, आर सी बुक, आर्थिक विवरण पत्रके व इतर पत्रके बँकेत जमा करणेस २ महिन्याचा कालावधी देणेत यावा).

५) ऑडीट रिपोर्ट मधील इतर पुर्तता २ महिन्यापर्यंत न केलेस प्रती महिना रु.२००/-दंड शुल्क आकारणी केली जाईल.(कर्जदारास ऑडीट रिपोर्ट मधील दोष पुर्तता करिता २ महिन्याचा कालावधी देणेत यावा).
६) कर्ज मंजुरी पत्रकातील अटींची पूर्तता २ महिन्यापर्यंत न केलेस प्रती महिना रु.२०० /- दंड शुल्क आकारणी केली जाईल.(कर्जदारास कर्ज मंजुरी पत्रकातील अटींची पुर्तता करणेस २ महिन्याचा कालावधी देणेत यावा).

वरील नियम आम्हास मान्य व कबुल आहेत. वरील नियमामधील अटींची पुर्तता न झालेस बँक आमचे वर सदर नियमाप्रमाणे दंड शुल्क आकारणी करेल याची पुर्णपणे कल्पना आम्हास आहे.तसेच रिझर्व्ह बँकेचे आदेशानुसार संचालक मंडळाकडुन वेळोवेळी ठरवले जाणारे दंड शुल्क नियम आम्हास मान्य व कबुल असुन आमच्यावर ते बंधनकारक राहील याबाबत कोणतीही तक्रार आम्ही करणार नाही व भविष्यात तक्रार सांगणार नाही.

कर्जदार सही

१)..... २).....

३)..... ४) .....

जामीनदार सही

१)..... २).....

३)..... ४) .....

मान्यता देणार सही

१)..... २).....

दिनांक :- / /